Tarun Bharat

# फिनोलेक्स-मुकुल माधवतर्फे चार अंगणवाड्यांचे लोकार्पण



कोळंबे : अंगणवाडी लोकार्पण सोहळ्याप्रसंगी डॉ. सुनील गायकवाड, ॲड. रुची महाजनी, केदार चव्हाण, रामबाबू संका, सागर चिवटे आदी.

। त. भा. प्रतिनिधी

**रत्नागिरी :** फिनोलेक्स कंपनीला ४५ वर्षे पूर्ण झाल्याच्या औचित्याने ग्रामीण भागातील बालकांना सुरक्षित, आनंददायी, प्रेरणादायी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी पोषक वातावरण मिळावे, या उद्देशाने फिनोलेक्स इंडस्ट्रीजच्या सीएसआर उपक्रमांतर्गत मुकुल माधव फाऊंडेशनतर्फे रत्नागिरीतील ग्रामीण भागात अंगणवाडी नूतनीकरणाचा उपक्रम राबविण्यात येत आहे.

तालुक्यातील गोळप आणि कोळंबे परिसरातील चार नूतनीकरण केलेल्या अंगणवाड्यांचे लोकार्पण नुकतेच करण्यात आले. यामध्ये गोळप मोहल्ला (उर्दू माध्यम) अंगणवाडी, कोळंबे मधील वाकीवाडी, मांडवकरवाडी आणि गोरीवलेवाडी या अंगणवाड्यांचा समावेश आहे.

हा उपक्रम मुकुल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू प्रकाश छाब्रिया आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे एक्झिक्युटिव्ह चेअरमन प्रकाश प्रल्हाद छाब्रिया यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे.

यावेळी आकाशवाणी केंद्र संचालक डॉ. सुनील गायकवाड, कार्यक्रम अधिकारी विवेक वानखेडे, सुहास नंदुरे, बालविकास प्रकल्प अधिकारी केदार चव्हाण व संदीप पाटील, ॲड. गौरव महाजनी व ॲड. रुची महाजनी तसेच फिनोलेक्सचे रामबाबू संका, सागर चिवटे, नंदकुमार शिंपी, अमित घोरपडे व आशिष आठवले उपस्थित होते. यावेळी सरपंच, अंगणवाडी सेविका, पालक, ग्रामस्थ तसेच शुभम भेगडे, शामराव निंबाळकर आणि वरद गोर हेही उपस्थित होते.